॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

*** सुविचार ***

आयुष्य म्हणजे एक आरसा आहे, आपण जसे पाहू तसेच ते दिसते.

■ अहिल्यानगर ■ मंगळवार, दि. २८ जुलै २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ५१ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com

# भंडारदरा पाणलोटात मुसळधार पाऊस



■ छाया । विद्याचंद्र सातपुते

## निळवंडेतून ७,५६० क्यूसेक विसर्ग सुरू । भंडारदरा धरण ९२ टक्के

● **अकोले । वीरभूमी–**

भंडारदरा पाणलोट क्षेत्रात रविवारी रात्री उशिरापर्यंत जोरदार पाऊस सुरू होता. त्यामुळे निळवंडे धरणातून रात्री साडेअकराच्या सुमारास ८,५०० क्यूसेकवरून वाढवून १३,००० क्यूसेक वेगाने प्रवरा नदीपात्रात पाणी सोडण्यात आले. मात्र सोमवारी दिवसभर पावसाचा जोर कमी झाल्यानंतर धरणातील विसर्ग टप्प्याटप्प्याने कमी करण्यात आला.

सोमवारी सकाळी ६ वाजेपर्यंत भंडारदरा येथे ९० मिमी, निळवंडे ४५ मिमी, आढळा ११ मिमी, अकोले १८ मिमी, रतनवाडी १२३ मिमी, घाटघर ९२ मिमी, पांजरे ६१ मिमी आणि वाकी येथे ६७ मिमी पावसाची नोंद झाली. हंगामातील एकूण पर्जन्यमान अनुक्रमे भंडारदरा १,७०३ मिमी, निळवंडे ७९२ मिमी, आढळा २८२ मिमी, अकोले ३९३ मिमी, रतनवाडी २,४४५ मिमी, घाटघर २,९६२ मिमी, पांजरे १,९८२ मिमी आणि वाकी १,४८० मिमी इतके झाले आहे.

सकाळी ६ वाजता भंडारदरा धरणातून ७,१५६ क्यूसेकने विसर्ग करण्यात येत होता. सध्या धरणात १०,१५६ दशलक्ष घनफूट (९२ टक्के) पाणीसाठा असून, वीजनिर्मितीसाठी ८३० क्यूसेकने पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

निळवंडे धरणात ७,८३५ दशलक्ष घनफूट (९४.०१ टक्के) पाणीसाठा झाला असून, पाणीपातळी नियंत्रित ठेवण्यासाठी धरणातून सध्या ७,५६० क्यूसेकने प्रवरा नदीपात्रात पाणी सोडण्यात येत आहे.

दरम्यान, आढळा धरणातून १,०९५ क्यूसेकने ओव्हरफ्लोचा विसर्ग सुरू असून, वाकी लघुपाटबंधारे तलावातूनही १,०२२ क्यूसेकने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळे प्रवरा नदीकाठच्या नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

**धर्म-संकट**

व्यवस्थेलाही झुकवता येते
फक्त हवी ध्येयाची भुरळ
सहज झटकता येईल असे
इतकेही क्षुद्र नसते झुरळ
राजीनाम्याने फरक होईल
या भ्रमात राहू नये फारसे
चुकांना दाखवण्यासाठी
रस्त्यावर उतरलेत आरसे

## SPOT NEWS

### १०, २० रुपयांच्या प्लास्टिक नोटा येणार

● **नवी दिल्ली** – भारतात लवकरच १० आणि २० रुपयांच्या प्लास्टिक(पॉलिमर) च्या नोटा पाहायला मिळू शकतात. केंद्र सरकारने रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या पॉलिमर नोटांच्या पायलट प्रोजेक्टला मंजुरी दिली आहे. त्यानुसार १० आणि २० रुपयांच्या १००-१०० कोटी पॉलिमर नोटा चाचणीसाठी जारी केल्या जातील. ही चाचणी यशस्वी ठरल्यास पॉलिमर नोटा मोठ्या प्रमाणात जारी करण्यासंदर्भात निर्णय घेतला जाऊ शकतो. केंद्रीय वित्त राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी लोकसभेत लेखी उत्तरात यासंदर्भात माहिती दिली. आरबीआयच्या पॉलिमर नोटांच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे. आता फक्त हा एक पायलट प्रोजेक्ट आहे. भारतातील हवामान आणि परिस्थितीत प्लास्टिक नोटा किती टिकाऊ आणि उपयुक्त ठरतात हे पाहिले जाणार आहे. लोकसभेत वित्त राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी दिलेल्या माहितीनुसार सरकारने १० आणि २० रुपयांच्या पॉलिमर बँक नोटांना मंजुरी दिली आहे.

### उजनी धरण १००% भरले

● **सोलापूर** – संपूर्ण सोलापूर जिल्ह्याचे अर्थकारण, राजकारण आणि समाजकारण अवलंबून असलेल्या उजनी धरणाने जलद गतीने का होईना आज अखेर उजनी धरण १०० टक्के भरले असून दौंड येथून ६६.४९२ क्युसेक विसर्ग उजनीत येत आहे. त्यामुळे उजनीचा शंभरीचा पल्ला गाठला आहे. उजनी भरल्याने शेतकऱ्यांच्या बरोबर उद्योग धंदे, कारखानदार उजनीवर पिण्याचे पाणी अवलंबून असणाऱ्या सोलापूर सह छोट्या मोठ्या शहरांतील नागरिकांचा, गावकर्यांचा जीव भांड्यांत पडला आहे. उजनी धरणांच्या वाढत्या पाणीसाठ्याकडे संपूर्ण सोलापूर जिल्ह्याचे लक्ष लागुन राहिले होते.

# उघड्या जम्बो गटारीत दुचाकीस्वार कोसळला

**अकोले-संगमनेर मार्गावरील धोकादायक गटार पुन्हा चर्चेत । संरक्षण कठडे उभारण्याची मागणी**



■ छाया । विद्याचंद्र सातपुते

● **अकोले । वीरभूमी–**

अकोले-संगमनेर मार्गावरील महालक्ष्मी कॉलनीसमोरील रस्त्यालगतच्या उघड्या जम्बो गटारीत सोमवारी सायंकाळी सुमारे ६ वाजता दुचाकीस्वार कोसळल्याची घटना घडली. गटारीत असलेल्या मोठ्या आरसीसी पाइपवर पडल्याने सुदैवाने त्यांना कोणतीही गंभीर दुखापत झाली नाही. स्थानिक व्यापारी व नागरिकांनी दोरीच्या साहाय्याने त्यांना सुखरूप बाहेर काढले.

तुकाराम भिमाजी साबळे (रा. आंभोळ, भवारवाडी) हे दुचाकीवरून संगमनेरहून अकोलेकडे येत असताना सेंट्रल बँकेसमोरील उघड्या गटारीजवळ त्यांची दुचाकी घसरली आणि ते सुमारे सात ते आठ फूट खोल गटारीत पडले.

स्थानिकांच्या माहितीनुसार, या धोकादायक गटारीत कोणी पडण्याची ही चौथी घटना आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे स्थानिक व्यापारी, नागरिक तसेच अकोले नगरपंचायतीच्या नगरसेविका शितल अमोल वैद्य यांनी अनेकदा गटारीभोवती संरक्षण कठडे उभारण्याची मागणी केली होती. मात्र, वारंवार आश्वासने देऊनही मागील चार वर्षांत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप करण्यात येत आहे.

अकोले-राजूर-संगमनेर मार्गाचे रुंदीकरण करण्यात आले असले, तरी शॅम्प्रो कार्यालयासमोरील सीडी वर्कची तरतूद मूळ अंदाजपत्रकात नसल्याचे सांगितले जात आहे. नागरिक आणि व्यापाऱ्यांच्या पाठपुराव्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी संबंधित ठेकेदाराला येथे नवीन सीडी वर्क उभारण्याच्या सूचना दिल्याचे सांगण्यात आले होते. तसेच आरसीसी पाइप आणण्यात आल्याचा दावा १६ नोव्हेंबर २०२२ रोजी नगरसेविका शितल वैद्य यांना पाठविलेल्या पत्रात करण्यात आला होता. मात्र, चार वर्षांनंतरही ना पाइप बसविण्यात आले, ना सीडी वर्कचे बांधकाम पूर्ण झाल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

वारंवार अपघात होऊनही सार्वजनिक बांधकाम विभागाने ठोस उपाययोजना न केल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. आणखी मोठी दुर्घटना किंवा जीवितहानी झाल्यानंतरच विभागाला जाग येणार का, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# बोअर ब्लास्ट टेक्निकचा वापर करणारे करंदी राज्यातील पहिले गाव

**१५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून जलस्रोत बळकटीकरण**



■ छाया । भगवान गायकवाड

● **पारनेर । वीरभूमी–**

कायम दुष्काळ आणि टँकरसाठी ओळखल्या जाणाऱ्या पारनेर तालुक्यातील करंदी गावाने जलस्रोत बळकटीकरणासाठी बोअर ब्लास्ट टेक्निक (बीटीटी) चा अवलंब करत नवा आदर्श निर्माण केला आहे. १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून हा उपक्रम राबविणारे करंदी हे महाराष्ट्रातील पहिले गाव ठरल्याचे प्रतिपादन अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या भूजल माहिती केंद्राचे समन्वयक तथा भूवैज्ञानिक अजिंक्य काटकर यांनी केले.

करंदी येथे जलस्रोत बळकटीकरण कामाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सरपंच एन. बी. गव्हाणे, उपसरपंच अर्जुन ठाणगे, भाऊसाहेब गांगड, पाटीलबा ठाणगे, पांडुरंग पिंपरकर, गणेश चौधरी, दत्तोबा ठाणगे, भूषण थोरात यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

काटकर म्हणाले, करंदीसारख्या पठारी भागातील गावांना दरवर्षी तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. त्यावर मात करण्यासाठी ग्रामपंचायतीने शास्त्रोक्त आणि अपारंपरिक उपाय म्हणून बोअर ब्लास्ट टेक्निकद्वारे भूजल पुनर्भरणाचे काम हाती घेतले आहे. करंदीचा हा उपक्रम राज्यासाठी आदर्श ठरेल. अशा प्रकारच्या उपाययोजनांमुळे भविष्यातील जलसंकटावर प्रभावीपणे मात करता येईल.

या उपक्रमामुळे गावातील विहिरी आणि बोअरवेलमध्ये अधिक काळ पाणी उपलब्ध राहण्यास मदत होईल, असा विश्वास गावचे नेते भास्कर गव्हाणे यांनी व्यक्त केला.

एल निनोच्या प्रभावामुळे आगामी काळात जलसंकट अधिक तीव्र होण्याची शक्यता असल्याने जलस्रोत बळकटीकरण आणि भूजल पुनर्भरणाबाबत व्यापक जनजागृतीची गरज असल्याचे आत्मनिर्धार फाउंडेशनचे अध्यक्ष महादेव गवळी यांनी सांगितले. या विषयावर शासन आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती मोहीम राबविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

# व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत तरुणीवर अत्याचार; भिलवडेच्या तीघांना अटक

● **पाथर्डी । वीरभूमी–**

एका युवतीवर प्रेमाचे जाळे टाकुन तिच्याशी शारीरीक संबध करतानाचा व्हीडीओ तयार केला. अर्धनग्न अवस्थेत फोटो काढले. पुन्हा भेटायला आली नाही तर व्हीडीओ व्हायरल करण्याची धमकी देवुन शारीरीक संबध ठेवले. हा प्रकार कोणाला सांगितला तर युवतीला व तिच्या घरच्यांना जिवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणात आणखी तिघा जणांनी युवतीला ब्लकमेल केले. हृदय पिळवटुन टाकणाऱ्या प्रकाराबाबत पोलिसांनी राहुल दिगंबर बडे व अभिषेक नवनाथ बडे यांना अटक केली. पाथर्डीच्या न्यायालयाने दोघांना ३० जुलै २०२६ पर्यत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

याबाबत सविस्तर समजलेली माहीती अशी की, युवती पोलिस भरतीचा सराव करीत होती. एका ॲकडमीमधे युवतीच्या संकेत रावसाहेब बडे रा. भिलवडे ता. पाथर्डी याच्याशी ओळख झाली. मोबाईलवर संपर्क वाढला. युवतीची आई बाहेरगावी गेली होती. युवतीचे वडील घराच्या स्लँपवर झोपलेले होते. मुलगी घरात एकटीच होती. त्याच दिवशी १४ मे २०२६ रोजी रात्री साडेबारा वाजता संकेत बडे युवतीच्या घरी गेला. मला मोबाईल चार्जर पाहीजे असे सांगितले. मुलीने दरवाजा उघडला. संकेत रावसाहेब बडे याने युवतीला तु मला फार आवडतेस असे म्हणुन शारीरीक सुखाची मागणी केली. मुलीने नकार दिला. तरीही मुलाने बळजबरीने शारीरीक संबध केले. शारीरीक संबध करताना व्हीडीओ तयार केला. अर्धनग्न अवस्थेत फोटो काढले. हा प्रकार कोणाला सांगितला तर युवतीला व तिच्या घरच्यांना जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर पुन्हा मला भेटायला ये नाहीतर

व्हीडीओ व्हायरल करीन अशी दमदाटी केली. अशी तक्रार मुलीने १७ जुन २०२६ रोजी पाथर्डी पोलिसात केली. त्यानंतर मुलीने २० जुन रोजी पुरवणी जबाब दिला. त्यामधे अक्षय मारुती बडे, राहुल दिगंबर बडे, अभिषेक नवनाथ बडे (सर्व रा. भिलवडे, ता. पाथर्डी) यांनी देखील मला त्रास दिल्याचे सांगितले. अर्धनग्न अवस्थेत मुलीचा असलेला व्हीडीओचा वापर करुन अनेकांनी युवतीला ब्लँकमेल केल्याची गंभीर घटना घडली आहे असे सांगितले. या प्रकरणात आणखी गंभीर प्रकार समोर येत आहेत. मात्र युवती बाबत काही तांत्रीक माहीती देण्यास पोलिसांनी नकार दिला आहे. वैद्यकीय तपासणीचे काही अहवाल येणे बाकी असल्याची माहीती मिळते. अहवाल आल्यानंतर या प्रकरणात आणखी काही आरोपींचा समावेश होण्याची शक्यता आहे. तपासी अधिकारी अमोल लहाने यांनी राहुल दिगंबर बडे, अभिषेक नवनाथ बडे यांना अटक करुन सोमवारी पाथर्डीच्या न्यायालया समोर हजर केले. यावेळी दोन्ही आरोपींना ३० जुलै पर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

### पोलिसांच्या तपासावरच संशय

■ युवतीची वैद्यकीय तपासणी केलेली आहे. त्याचा अंतीम अहवाल येणे बाकी आहे. त्यांनतर अनेक गोष्टी समोर येतील. युवतीशी घडलेला प्रकार एवढा गंभीर असताना हे प्रकरण स्थानिक पातळीवर मिटवामिटवी करण्याचा प्रयत्न झालेला आहे का? यामध्ये कोणा-कोणाचा समावेश आहे? प्रकरण मिटविण्यासाठी काय तडजोडी झाल्या आहेत का? याचा तपास पोलिस करतील का? असे अनेक प्रश्न आज तरी अनुत्तरीत आहेत.

### मुख्य आरोपी का सापडत नाही?

■ १७ जुन २०२६ रोजी बलात्काराचा गंभीर गुन्हा दाखल झालेला आहे. अश्लील व्हीडीओ तयार करवुन युवतीच्या इज्जतीचा बाजार मांडणारा पहीला संशयीत आरोपी संकेत रावसाहेब बडे याचा तपास पोलिसांना का लागला नाही. प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधीला या प्रकरणाची माहीती देवु नये असे आदेश पोलिस अधिकाऱ्यांनी का दिले. या प्रकरणात आणखी काही काळे-बेरे आहे का? एरव्ही पाचशे रुपयाची दारु पकडली तर प्रेसनोट देणाऱ्या पोलिसांनी हे प्रकरण गुप्त का ठेवले? मुख्य संशयीत आरोपी संकेत बडे पोलिसांना का सापडत नाही? या प्रश्नांनी सामान्य माणुस आवाक झाला आहे.

# रुग्णवाहिका न देणाऱ्या डॉक्टरांवर कारवाई करण्याची सर्वपक्षिय मागणी

**कारवाई न झाल्यास ५ ऑगस्टला शासकीय कार्यालयांना टाळे लावण्याचा इशारा**

● **श्रीगोंदा । वीरभूमी–**

लोणीव्यंकनाथ येथील आनंदी अनील कांडेकर व विरा प्रविण कांडेकर या दोन बालकांना उपचारासाठी रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आली नाही, असा आरोप करीत संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी सर्वपक्षीय मोर्चातून करण्यात आली. डॉ. प्रशांत मुळे व डॉ. शैला डांगे यांना निलंबित न केल्यास ५ ऑगस्ट रोजी श्रीगोंदा तहसील कार्यालय, पोलीस ठाणे आणि पंचायत समिती कार्यालयाला टाळे लावण्यात येईल, असा इशारा आंदोलकांनी दिला.

सोमवारी संत शेख महंमद महाराज मंदिरापासून मोर्चाला सुरुवात झाली. तहसील कार्यालयासमोर सभेत त्याचे रूपांतर झाले. यावेळी पोलिस उपअधीक्षक सुजितकुमार क्षीरसागर, तहसीलदार सचिन डोंगरे आणि गटविकास अधिकारी राणी फराटे यांना निवेदन देण्यात आले.

माजी आमदार राहुल जगताप यांनी आंदोलकांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे चुकीच्या पद्धतीने नोंदविण्यात आल्याचा आरोप केला. पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी निष्पक्षपणे काम करण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

नागवडे साखर कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे यांनी, दोन बालकांना रुग्णवाहिका न देणे हे त्यांच्या मूलभूत हक्कांवर गदा आणणारे असून मानवी दृष्टिकोनातूनही अयोग्य असल्याचे म्हटले. संबंधित डॉक्टरांवर निलंबनाची कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला.



■ छाया । विजय उंडे

### प्रशासनाची आश्वासने

■ अज्ञात १५ आंदोलकांची नावे निष्पन्न केली जाणार नाहीत, असे आश्वासन पोलिस उपअधीक्षक सुजितकुमार क्षीरसागर यांनी दिले. लोणीव्यंकनाथ प्राथमिक आरोग्य केंद्रातील घडलेल्या प्रकाराचा आणि आंदोलनाचा अहवाल तातडीने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात येईल, अशी माहिती तहसीलदार सचिन डोंगरे यांनी दिली. डॉ. प्रशांत मुळे व डॉ. शैला डांगे यांच्या निलंबनासंदर्भातील निवेदन जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात येईल, असे गटविकास अधिकारी राणी फराटे यांनी सांगितले.

बाळासाहेब नाहाटा यांनी, बालकांना न्याय देण्याऐवजी आंदोलन दडपण्यासाठी गुन्हे दाखल करण्यात आल्याचा आरोप करीत आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याची मागणी केली.

सभेत राजेंद्र म्हस्के, अनिल ठवाळ, टिळक भोस, स्मितल वाबळे, हरिदास शिर्के, राजेंद्र निळकंठ नागवडे, अरविंद कापसे, सुनीता दरवडे, छाया भोसले, विजय मकासरे आणि कांतीलाल कोकाटे यांनीही मनोगते व्यक्त केली. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक व तरुण कार्यकर्ते उपस्थित होते.

# SPOT NEWS


■ छाया । अमोल कराळे

## अर्जुनराव फडके यांना सामाजिक कार्यगौरव पुरस्कार प्रदान

**● शेवगाव । वीरभूमी –**

देऊळगाव राजा (जि. बुलढाणा) येथील श्री जगदंबा देवी ट्रस्ट व फाउंडेशनतर्फे दिला जाणारा यंदाचा सामाजिक कार्यगौरव पुरस्कार शेवगाव येथील गुरुदत्त सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, कला व क्रीडा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अर्जुनराव फडके यांना प्रदान करण्यात आला. गुरुपौर्णिमा सोहळा २०२६ निमित्त आयोजित कार्यक्रमात ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मुकुंदनाथ आंधळे व अमोल गावंडे (माहूरगड, तांबूलवाला) यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. सन्मानचिन्ह व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. अर्जुनराव फडके हे गेल्या २५ वर्षांपासून गुरुदत्त सामाजिक संस्थेच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबवत आहेत. गरजू व गरीब कुटुंबांना वस्त्रदान, किराणा वाटप, निराधार विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्याचे वितरण तसेच योगतज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन वृद्धाश्रमाच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांसाठी सातत्याने सेवा कार्य करत आहेत. गुरुदत्त सामाजिक संस्था संचलित दत्त देवस्थानच्या माध्यमातूनही त्यांचे आध्यात्मिक व सामाजिक कार्य सुरू आहे. यावेळी ज्येष्ठ साधक पी. बी. शिंदे, ओमप्रकाश बाहेती, प्रा. डॉ. काकासाहेब लांडे, जगन्नाथ गोसावी, लक्ष्मण काळे आदी उपस्थित होते. अर्जुनराव फडके यांना हा मानाचा व प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाल्याबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## श्री क्षेत्र भगवानगडावर उद्या होणार गुरुपूजन सोहळा

**● पाथर्डी । वीरभूमी –**

महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र भगवानगडावर दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी भव्य गुरुपूजन सोहळा साजरा होणार आहे. अज्ञान आणि अंधश्रद्धा पसरलेल्या समाजात जनजागृती करून वै.गुरुवर्य श्री संत भगवानबाबांनी अज्ञानी समाजाला अध्यात्मासोबतच शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. अनेक धार्मिक ठिकाणच्या पशुहत्या कायमस्वरूपी बंद केल्या. गळ्यामध्ये पवित्र तुळशीची माळ घालून सदाचार करण्याचे आवाहन बाबांनी समाजाला केले. एक्कर विका, पण मुलांना शिकवा हा बहुमोलाचा संदेश बाबांनी समाजाला दिला. एकंदरीत बाबांनी आपल्यावर केलेल्या उपकारांची जाणीव ठेवून आभार अभिव्यक्त करण्याचा दिवस म्हणजे 'गुरुपौर्णिमा' होय. या दिवशी गडाचा संपूर्ण भक्तवर्ग भगवानगडावर येऊन आपल्या श्रीगुरुंचे आभार अभिव्यक्त करतो. ऐश्वर्यसंपन्न संत भगवानबाबांना आपले श्रीगुरु मानणाऱ्या सर्वांनी रविवारी भगवानगडावर येऊन आपल्या श्रीगुरु विषयीचा आदरभाव अभिव्यक्त करावा. गुरुपूजन सोहळ्याचा मुख्य कार्यक्रम बुधवारी सकाळी ठीक १० वाजता सुरु होणार आहे.

## ज्ञानोबा माऊली तुकारामांचा गजर करत चिमुकल्यांची दिंडी सोहळा

**● पारनेर । वीरभूमी –**

आषाढी एकादशीच्या पवित्र पर्वावर पारनेर तालुक्यातील पुणेवाडी येथील श्रीनाथ शिक्षण संस्थेच्या भैरवनाथ विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सहभागाने एक अत्यंत आकर्षक आणि चैतन्यमय बालदिंडी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या विशेष कार्यक्रमामुळे संपूर्ण पुणेवाडी गाव वारकरी संप्रदायाच्या भक्तीभावात न्हाऊन निघाल्याचे दिसून आले. दिंडीच्या निमित्ताने विद्यालयातील विद्यार्थ्यांनी साकारलेली विठ्ठल आणि रुक्मिणीची सजीव वेशभूषा उपस्थितांचे मुख्य आकर्षण ठरली. लहान चिमुरड्यांच्या अंगावर पांढरे शुभ्र वस्त्र, टीवर हात ठेवलेली रूपे आणि गळ्यात तुळशीच्या माळा यामुळे जणू प्रत्यक्ष पंढरपूरच पुणेवाडीत अवतरल्याचा भास होत होता. बाल वारकऱ्यांच्या हातात लहराणारे भगवे झेंडे, टाळ-मृदंगांचा गजर आणि 'ज्ञानबा-तुकाराम'चा जयघोष यांमुळे संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. गावातून निघालेली ही दिंडी भैरवनाथ मंदिराच्या भव्य प्रांगणात पोहोचली. तेथे निसर्गाच्या रम्य सानिध्यात लहान-थोर वारकरी, शिक्षक-शिक्षिका आणि ग्रामस्थांनी मिळून पारंपरिक फुगडीचा मनसोक्त आनंद लुटला. या सामूहिक आनंदसोहळ्यात आबालवृद्धांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला होता. भक्तीमय वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाने सर्वांचे मन जिंकले.

# बारव बांधून शेजारी वृक्षलागवड; पर्यावरण संवर्धनाचा इतिहास

### अकोळनेरच्या पाटलाचा १८०० सालचा दुर्मीळ शिलालेख इतिहास उजागर करणारा

**■ विजय उंडे**

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

नगर तालुक्यातील अकोळनेर गावात सापडलेला शके १७२२ (इ.स. १८००) मधील बारव शिलालेख तत्कालीन गावकारभार, जलसंवर्धन, पर्यावरण संवर्धन आणि धार्मिक श्रद्धा यांचा दुर्मीळ दस्तऐवज म्हणून समोर आला आहे. बारव बांधून तिच्या शेजारी झाडांची वाटिका उभारल्याची नोंद असलेला हा शिलालेख मराठा कालखंडातील लोककल्याणकारी कामांचा महत्त्वपूर्ण पुरावा मानला जातो.

पुणे-नगर मार्गावरील चास गावापासून सुमारे सहा किलोमीटर अंतरावर असलेल्या मौजे अकोळनेर गावाच्या पूर्वेकडील रस्त्यालगतच्या चौरसाकृती चावीच्या आकाराच्या बारवेवर हा शिलालेख कोरलेला आहे. बारवेच्या पायऱ्या उतरताना उजव्या बाजूस हा लेख दिसून येतो. सात ओळींचा हा उठाव स्वरूपातील शिलालेख देवनागरी लिपीत मराठी भाषेत असून दोन्ही बाजूंना गरुड आणि हनुमंत यांच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. दीर्घकाळ पाण्यात राहिल्याने त्यावर शेवाळ व पांढरे चट्टे आले असून अनेक अक्षरे झिजलेली आहेत. तरीही छाप घेऊन अथक प्रयत्नांनंतर लेखाचे वाचन शक्य झाले.



**शिलालेखाचे वाचन**

**१. श्री गणेशायनमः स्वस्ति श्री नृप शाळीवाहन**

**२. शके १७२२ रुदरो (रौद्र) नाम संवछरे**

**३. माघ मासे बहुळ पाडूरंग चेरनीचे**

**४. तत्पर विठोजी पाटील मोकदम सुत बाबा**

**५. जी पाटील जेवर नीरंतर कसबे अकोळ**

**६. नेर गूंफला देव समालना बांधून**

**७. वटीका नडे मांडली कृस्णार्पनमस्तु...**

**शिलालेखाचा अर्थ**

या लेखानुसार शालिवाहन शक १७२२, रौद्र नाम संवत्सर, माघ बहुल (३० जानेवारी १८००, शुक्रवार) रोजी मौजे कसबे अकोळनेर येथील मोकदम विठोजी पाटील यांचे पुत्र बाबाजी पाटील यांनी बारव बांधून तिच्या शेजारी झाडांची वाटिका उभारली. हे संपूर्ण कार्य श्री पांडुरंगाच्या चरणी आणि कृष्णार्पणमस्तु या भावनेने अर्पण करण्यात आले असल्याची नोंद या शिलालेखात आहे.

**इतिहासाला दिशा देणारा पुरावा**

या शिलालेखात बाबाजी पाटील यांचा मोकदम म्हणून उल्लेख आढळतो. मोकदम हा त्या काळातील गावाचा प्रमुख आणि महसूल व्यवस्थेतील महत्त्वाचा अधिकारी होता. त्यामुळे तत्कालीन गावकारभाराची रचना, स्थानिक प्रशासन आणि लोकहिताची कामे कशी केली जात होती याची माहिती या लेखातून मिळते.

विशेष म्हणजे, बारव बांधण्याबरोबरच तिच्या शेजारी झाडांची वाटिका तयार करण्यात आल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. त्यामुळे दोनशेहून अधिक वर्षांपूर्वी जलसंवर्धन आणि पर्यावरण संवर्धन या दोन्ही बाबींना समान महत्त्व दिले जात असल्याचे अधोरेखित होते. धार्मिक श्रद्धा, सार्वजनिक हित आणि पर्यावरण यांचा सुंदर संगम या शिलालेखातून दिसून येतो.

शके १७२२ हा मराठे, इंग्रज आणि निजाम यांच्यातील राजकीय संघर्षाचा काळ असतानाही सार्वजनिक पाणीपुरवठा, वृक्षलागवड आणि समाजोपयोगी बांधकामे सुरू होती, हे या शिलालेखातून स्पष्ट होते. त्यामुळे हा लेख केवळ धार्मिक न राहता सामाजिक, आर्थिक, प्रशासकीय, पर्यावरणीय आणि वास्तु-इतिहासाचा महत्त्वपूर्ण पुरावा ठरतो.

या शिलालेखाचे वाचन, माहिती, संकलन व संशोधन पुणे येथील अनिल किसन दुधाणे व अथर्व पिंगळे यांनी केले आहे.

वालुंबा नदीच्या काठावर वसलेले अकोळनेर हे अहिल्यानगरजवळील प्राचीन ऐतिहासिक गाव आहे. स्थानिक परंपरेनुसार अकरा ऋषींनी येथे तपश्चर्या केल्यामुळे गावाला अकोळनेर हे नाव पडल्याचे सांगितले जाते. नदीकाठी वसलेल्या या गावात उत्तर यादवकालापासून मराठेशाही आणि ब्रिटिश काळापर्यंतच्या वास्तूंचे अनेक पुरावे आजही पाहावयास मिळतात.

महादेव मंदिर, १२ व्या शतकातील पुष्करणी, विरगळ, मारुती, श्रीकृष्ण, दत्त व खंडोबा मंदिरे, बारवा, पायविहिरी, गावाच्या वेशी तसेच दर्गे अशी अनेक ऐतिहासिक स्मारके येथे आहेत. या गावात उपलब्ध असलेल्या पाच शिलालेखांत कसबे अकोळनेर असा उल्लेख आढळतो. यावरून हे गाव तत्कालीन महत्त्वाचे बाजारपेठीय, प्रशासकीय आणि समृद्ध केंद्र असल्याचे स्पष्ट होते. या शिलालेखांमधून जहागीरदार, वतनदार, मोकदम पाटील, कारागीर, ग्रामरचना आणि सार्वजनिक बांधकामांची मौल्यवान माहिती मिळते. त्यामुळे अकोळनेरचा सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक इतिहास उलगडण्यास हे शिलालेख अत्यंत महत्त्वाचे ठरतात.

## वयाच्या अवघ्या ८ व्या वर्षी ५२ किमी पन्हाळा-पावनखिंड पदभ्रमंती; बालमावळ्यांचा पराक्रम

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनच्या वतीने हिल रायडर्स फाऊंडेशन, कोल्हापूर यांच्या सहकार्याने आयोजित राज्यस्तरीय पन्हाळा-पावनखिंड ५२ किमी पदभ्रमंती मोहिमेत ७५० मावळ्यांनी सहभाग घेतला. यामध्ये राजवीर संतोष रोकडे (वय ८ वर्षे १० महिने) आणि आदित्य भरत खोमणे (वय १० वर्षे १ महिना) या दोन बालमावळ्यांनी अवघ्या बालवयात ही खडतर मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण करून सर्वांचे लक्ष वेधले.


■ छाया । विजय उंडे

दोन्ही बालमावळे आपल्या वडिलांसोबत मोहिमेत सहभागी झाले होते. संपूर्ण पदभ्रमंतीत त्यांनी न थकता गड, डोंगर, चिखल आणि ओढे पार करत पावनखिंड गाठली. त्यांच्या या धाडसाबद्दल हिल रायडर्स फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रमोद पाटील यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच 'चांडाळ चौकडी' वेब सिरीज फेम रामभाऊ जगताप यांनी रोख पारितोषिक देऊन त्यांचे कौतुक केले.

शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेश इंगळे यांच्या नेतृत्वाखाली गेल्या १०४ महिन्यांपासून सहपरिवार दुर्गभ्रमंती व वारसा संवर्धनाची चळवळ सुरू असून, त्यातून शिवविचार जपणारी नवी पिढी घडत असल्याचे यानिमित्ताने अधोरेखित झाले.

## ठाकूर निमगाव ग्रामपंचायतीच्या विकासकामांच्या चौकशीची मागणी; मंत्रालयासह वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार

**● शेवगाव । वीरभूमी–**

तालुक्यातील ठाकूर निमगाव ग्रामपंचायतीच्या विविध विकासकामांची माहिती माहिती अधिकार कायद्यानुसार निर्धारित मुदतीत उपलब्ध करून देण्यात आली नसल्याचा आरोप करत ॲड. लक्ष्मण मडके आणि उद्योजक साईनाथ कातकडे यांनी मंत्रालयासह वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली आहे. माहिती देण्यास झालेल्या विलंबामुळे ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचा आरोप करत संपूर्ण विकासकामांची प्रशासकीय व तांत्रिक स्तरावर उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी गटविकास अधिकारी सोनल शहा यांच्याकडे करण्यात आली आहे.

तक्रारदारांनी ग्रामपंचायतीकडे विविध विकासकामांची अंदाजपत्रके, मोजमाप पुस्तिका (एम.बी.), मालमत्ता नोंदवही, खरेदी प्रक्रिया, बिले, देयके तसेच इतर आवश्यक कागदपत्रांची माहिती मागविली होती. मात्र, माहितीचा अधिकार कायद्यानुसार निर्धारित मुदत संपूनही संबंधित ग्रामसेवकांकडून माहिती उपलब्ध करून देण्यात आली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी मंत्रालय, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच शेवगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करण्यात आला आहे.

तक्रारीत ग्रामपंचायतीच्या सर्व विकासकामांची सखोल चौकशी, प्रत्यक्ष स्थळ पाहणी, कामांच्या नोंदींची छाननी, निधीच्या वापराची पडताळणी तसेच संबंधित अभिलेखांची तपासणी करून आवश्यक असल्यास जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. विकासकामांमध्ये पारदर्शकता राहावी आणि वस्तुस्थिती जनतेसमोर यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. माहिती वेळेत का देण्यात आली नाही, हा या प्रकरणातील महत्त्वाचा मुद्दा असून, हा केवळ प्रशासकीय निष्काळजीपणा आहे की त्यामागे अन्य कारणे आहेत, याबाबत ग्रामस्थांमध्ये चर्चा सुरू आहे. माहिती न मिळाल्यामुळे ग्रामपंचायतीच्या कारभारातील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचा आरोप करण्यात आला असून, संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## अतिवृष्टीचे तातडीने पंचनामे करुन नुकसान भरपाई द्यावी; ग्राहक पंचायतची मागणी

**● अकोले । वीरभूमी–**

अकोले आदिवासी भागामध्ये अतिवृष्टीचे पंचनामे त्वरीत करावे व त्यांना तातडीने नुकसान भरपाई मिळण्याबाबतचे निवेदन अकोल्याचे तहसिलदार डॉ. सिध्दार्थ मोरे यांना दिल्याची माहिती ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलीक, सचिव राम रुद्रे, भाऊसाहेब वाकचौरे यांनी दिली.

निवेदनात म्हटले आहे की, जुलै महिन्यात व सध्या अकोले तालुक्यात गेली आठ दहा दिवसा पासून सातत्याने जोरदार पाऊस पडत असल्याने व बऱ्याच भागात अतिवृष्टी झाल्याने अकोल्याच्या पश्चिम आदिवासी भागासह शेतकऱ्यांचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

अकोले तहसील प्रशासनाने व तालुका कृषी अधिकारी यांनी शेतकऱ्यांचे त्वरीत अतिवृष्टीचे पंचनामे करावेत अशी मागणी अकोले तालुका ग्राहक पंचायतच्या वतीने प्रसिद्धी दिलेल्या पत्रकाव्दारे केली आहे.

अकोले तालुक्यातील आदिवासी शेतकरी पाऊस उशिरा झाल्याने भात पिक लावण्यात उशिर झाला पाऊस उशिरा झाल्याने शेतकऱ्यांनी भात पिकाची व इतर्स पिकाची पेरनी लागवड केली मात्र काही दिवस पावसाने उघडदीप दिली मात्र पुन्हा एकदा आठ ते दहा बारा दिवसापासून सतत धार पाऊसाने शेतकरी मेटाकुटीस आला.

पावसाच्या सातत्याने भात पिके पाण्याखाली गेली आहे तर आदिवासी भागातील भात शेतीचे बांद, व शेती वाहून गेल्याने शेतीच नष्ट झाली. यामुळे आदिवासी शेतकरी वर्ग बेचैन झाला आहे. शेतकऱ्यांनी एकमेकाची सावड करून भाताची लागवड केली. त्यात भात वाहून गेल्याने वर्षभराच्या भात शेतीचे उत्पन्नावर अवलंबून असते तेच पिके न शेती वाहून गेल्याने, हरिश्चंद्रगड, पाचनई, साम्रद, घाटघर, रतनवाडी फोफसंडी, पांजरे, उडदावने, वारंघुशी, तिरडा, पाचपट्टा, बिताका कुमशेत, आदी भागां मध्ये शेतकऱ्याचे फार मोठे नुकसान झाले आहे.

अकोले प्रशासनाने यांची त्वरीत दखल घेऊन पंचनामे करावेत. अनेक भागात शेतीसह दरड, झाडे कोसळल्याने घरांचे नुकसान झाले, जनावरे दगावली अधिकाऱ्यांनी यांची त्वरीत दखल घ्यावी असे निवेदनात म्हटले आहे.


■ छाया । विद्याचंद्र सातपुते

निवेदनावर ग्राहक पंचायतचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलिक, अध्यक्ष दत्ता शेनकर, कार्याध्यक्ष महेश नवले, सचिव राम रुद्रे, भाऊसाहेब वाकचौरे, अनंत घाणे, गंगाराम धिंदळे, सयाजी आस्वले, दत्तात्रय मुठे, मोहन मुंढे,सुरेश गभाले, अशोक उघडे, महादू उघडे, लक्ष्मण उघडे, माधवराव तिटमे, रामदास पवार, गणपत थिगळे, ज्ञानेश्वर पुंडे, प्रदीप हासे, रामहरी तिकांडे, भाऊसाहेब गोर्डे, आदींची नावे आहे.

निवेदनाच्या प्रती जलसंधारण मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हाधिकारी अहिल्यानगर, तालुका कृषी अधिकारी यांना पाठविण्यात आल्या आहे.

# गोदावरी डाव्या कालव्यातून उपसा सिंचनद्वारे पाणी उचलण्यासाठी पाटबंधारे विभागाकडून सर्वेक्षण : आ. आशुतोष काळे

**● कोपरगाव । वीरभूमी –**

कोपरगाव तालुक्याच्या पूर्व भागातील नागरीकांचा मागील कित्येक दशकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा सुटावा यासाठी जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पा. यांच्याकडे केलेल्या पाठपुराव्यातून ओव्हरफ्लोच्या काळात गोदावरी डाव्या कालव्यातून उपसा सिंचनद्वारे पाणी उचलण्यासाठी शुक्रवारी सर्व्हेक्षण करण्यात आले असल्याची माहिती आमदार आशुतोष काळे यांनी दिली आहे.

जलसंपदा विभागाचे तात्कालीन अधिकारी अपर मुख्य सचिव दिपक कपूर, सचिव संजय बेलसरे, गोदावरी मराठवाडा सिंचन विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक तीरनमवार, जलसंपदा विभाग छत्रपती संभाजीनगरचे मुख्य अभियंता विजय घोगरे व गवळी, छत्रपती संभाजीनगर अधीक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरणचे सब्बीनवार, जलसंपदा विभाग उत्तर महाराष्ट्र प्रदेश जलसंपदा नासिकचे मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ, अधीक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण नासिकचे राजेश गोर्वधणे, मंत्रालय जलसंपदा विभागाचे सह सचिव तथा मुख्य अभियंता संजीव टाटू आदी अधिकाऱ्यांच्या समवेत जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत आ. आशुतोष काळे यांनी पूर्व भागातील अनेक गावांना पिण्याच्या पाण्याच्या पाण्याची मोठी अडचण असल्यामुळे ओव्हरफ्लोच्या काळात गोदावरी डाव्या कालव्यातून उपसा सिंचनद्वारे पाणी उचलण्यास परवानगी द्यावी अशी मागणी जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पा. यांच्याकडे केली होती. त्या मागणीला जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पा. सकारात्मक प्रतिसाद देवून जलसंपदा विभागाला त्याबाबत पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

त्या सूचनेनुसार जलसंपदा विभागाकडून सर्व्हेक्षण करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. गोदावरी डाव्या कालव्यातून उपसा सिंचनद्वारे पाणी उचलण्यासाठी कशा पद्धतीने नियोजन करता येईल याचा अहवाल सबंधित अधिकारी जलसंपदा विभागाकडे सादर करणार आहे. त्यानुसार लवकरच गोदावरी डाव्या कालव्यातून उपसा सिंचनद्वारे पाणी उचलले जावून या पाण्यातून पाणी पुरवठा करणाऱ्या योजनांचे साठवण तलाव भरून घेतले जावून पूर्व भागातील नागरीकांना भेडसावणारा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा दूर होणार आहे. त्याचा फायदा नाटेगाव, अंचलगाव, पढेगाव, करंजी, ओगदी, कासली, सावळगाव, शिरसगाव, तिळवणी, उक्कडगाव आदी पूर्व भागातील गावांना होणार आहे. उपसा सिंचनद्वारे पिण्यासाठी व बंधारे भरण्यासाठी पाणी उपलब्ध करून देण्यासाठी सर्वेक्षण करण्यात आल्यामुळे पूर्व भागातील नागरीकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.


■ छाया । जनार्दन जगताप

यावेळी संदीप पाटील उपविभागीय अभियंता गोदावरी डावा तट कालवा उपविभाग कोपरगाव, शाखा अभियंता बी. आर. पवार, प्रशांत सारंगधर, धनेश मंडलिक, सेवा निवृत्त अभियंता तात्यासाहेब थोरात, जिनिंग प्रेसिंगचे संचालक नानासाहेब निकम, संदीप शिंदे, तसेच राष्ट्रवादीचे स्थानिक कार्यकर्ते रविंद्र सुंबे, रवींद्र निकम, अंकुश मलिक, बाबासाहेब सुंबे, अशोक भोकरे, अमृत शिंदे आदींसह पूर्व भागातील कार्यकर्ते उपस्थित होते.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## लोणी हवेलीत भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला दिंडी सोहळा!

**पारनेर । वीरभूमी–**

श्री भगवंत नाथुजी कोल्हे लोणेश्वर विद्यालय, लोणी हवेली, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लोणी हवेली, खडकवाडी आणि कोल्हेवस्ती यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच समस्त ग्रामस्थांच्या सक्रिय सहकार्याने गावात एका भव्य व आकर्षक दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमात परिसरातील विद्यार्थ्यांनी अतिशय उत्स्फूर्त सहभाग नोंदवत संपूर्ण परिसर भक्तिमय करून सोडला. दिंडी सोहळ्यादरम्यान लोणेश्वर विदयालयाच्या गुणवान विद्यार्थीनींनी आपल्या सुरेल आवाजात सादर केलेल्या अभंग व गवळणींनी उपस्थितांची मने जिंकली. यामध्ये ज्ञानेश्वरी दुधाडे, समृद्धी कोल्हे, प्राची कोल्हे, मानशी सोंडकर, नव्या कोल्हे आणि कार्तिकी कोल्हे या विद्यार्थिनींनी अत्यंत सुंदर अभंग व गवळणी सादर केल्या. त्यांच्या या गोड गायनाचे गावकऱ्यांनी तोंडभरून कौतुक केले. तसेच, गावातील भजनी मंडळाची विशेष साथ या सोहळ्याला लाभली, ज्यामुळे दिंडीची रंगत आणखीनच वाढली. सुरेशदादा जगताप यांनी अत्यंत कौशल्यपूर्ण पखवाज वादन करत सुंदर अभंग गायन केले, ज्याला उपस्थित वारकऱ्यांची मोठी दाद मिळाली. हा दिंडी सोहळा अत्यंत यशस्वी आणि आनंददायी पार पाडण्यासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक रेपाळे सर,दातीर सर, सोनाली मॅडम, राणी मॅडम, जासूद सर तसेच प्राथमिक शाळांचे मुख्याध्यापक सिनारे सर, थोरात सर, नरसाळे सर आणि शिंदे सर यांनी विशेष परिश्रम व मार्गदर्शन केले. लोणी हवेलीच्या सरपंच जान्हवी दुधाडे, ग्रामपंचायत सदस्य शिवाजी थोरे आणि शत्रूघ्न नवघने यांचे विशेष सहकार्य लाभले. विशेष आकर्षण म्हणजे, सरपंच जान्हवी दुधाडे व ग्रामपंचायत सदस्य शिवाजी थोरे यांनी विद्यार्थ्यांसोबत सुंदर गवळणी म्हणत ठेका धरला.दिंडीत सहभागी झालेल्या लहान मुलांसाठी सरपंच जान्हवीताई दुधाडे, शिवाजी थोरे, बाजीराव दुधाडे, युवराज जगताप, बंटी दाते, बबलू कोल्हे, निलेश वाखारे व दादाभाऊ कोल्हे यांच्या वतीने ठिकठिकाणी खाऊ व पिण्याच्या पाण्याची उत्तम सुविधा करण्यात आली होती. तसेच, दिंडीसाठी लागणारे ट्रॅक्टर सौजन्य श्री. विकास दुधाडे यांनी उपलब्ध करून दिले.

## शतकपूर्ती लाभलेल्या भागीरथीबाई अण्णासाहेब चौधरी यांचे निधन

**कोपरगाव । वीरभूमी–**

तालुक्यातील कान्हेगाव येथील ज्येष्ठ नागरिक तथा शतकपूर्ती



लाभलेल्या भागीरथीबाई अण्णासाहेब चौधरी (वय १०२) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत असून, त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. भागीरथीबाई चौधरी यांनी आयुष्यभर कष्ट, साधेपणा आणि संस्कार यांची जपणूक केली. गावातील अनेक पिढ्यांना त्यांनी मायेचा आधार दिला. त्यांच्या शांत, प्रेमळ आणि सेवाभावी स्वभावामुळे त्या सर्वांच्या आदराच्या पात्र ठरल्या होत्या. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच नातेवाईक, ग्रामस्थ आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या निधनाने चौधरी परिवारासह कान्हेगाव परिसरावर शोककळा पसरली आहे.

## अगस्ती कारखान्याचे माजी कार्यकारी संचालक भागवतराव वैद्य यांचे निधन

**अकोले । वीरभूमी–**

अगस्ती कारखान्याचे माजी कार्यकारी संचालक भागवतराव



लक्ष्मण वैद्य (वय -८५, रा. सुगाव खुर्द, ता. अकोले हल्ली अगस्ती कारखाना रोड, अकोले) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे, भाऊ, बहिणी असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर अकोले येथील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. प्रगतीशील शेतकरी किरण वैद्य, सुगाव खुर्द विकास सोसायटीचे संचालक प्रशांत वैद्य व सुरेखा दिलीप पानसरे यांचे ते वडील होत. अत्यंत कडक शिस्तीचे असणारे बी. एल. वैद्य यांनी संगमनेर कारखान्यात शेतकी अधिकारी, कन्नड सहकारी साखर कारखाना, संत दामाजी सहकारी साखर मंगळवेढा तसेच अगस्ती सहकारी साखर कारखाना येथे कार्यकारी संचालक म्हणून त्यांनी काम पाहिले. सोलापूर येथे सहकाररत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जगद्गुरू संत जनार्दन स्वामी यांचे ते शिष्य होते. अकोले तालुक्यातील सुगाव खुर्द येथे सर्वात प्रथम जनार्दन स्वामी यांना त्यांनी बोलवले होते. त्यांच्या निधनाने सर्वत्र शोक व्यक्त केला जात आहे.

# अकोले नगराध्यक्ष निवडणुकीत भाजपमध्येच तिरंगी लढत

### नगराध्यक्षपदासाठी चार उमेदवारांचे पाच अर्ज । भाजपच्या दोन गटांत मुख्य सामना रंगण्याची शक्यता

**अकोले । वीरभूमी –**

अकोले नगरपंचायत नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजपमधील तीन इच्छुकांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने निवडणुकीत मोठी रंगत निर्माण झाली आहे. नगराध्यक्षपदासाठी एकूण चार उमेदवारांचे पाच अर्ज दाखल झाले असून, छाननीअंती चार अर्ज वैध ठरल्याची माहिती प्रांताधिकारी तथा पीठासन अधिकारी अरुण उंडे यांनी दिली.

भाजपचे माजी आमदार वैभवराव पिचड यांच्या उपस्थितीत नगरसेविका तथा बांधकाम सभापती वैष्णवी सोमेश्वर धुमाळ यांनी पक्ष पदाधिकाऱ्यांसह मुख्याधिकारी धनश्री पवार यांच्याकडे उमेदवारी अर्ज दाखल केला. हा अर्ज भाजपच्या कोअर कमिटीच्या निर्णयानुसार भरल्याचे सांगितले जात आहे.

दुसरीकडे, भाजप महिला आघाडीच्या प्रदेश सचिव सोनाली चेतन नाईकवाडी यांनी १२ नगरसेवकांच्या उपस्थितीत दोन उमेदवारी अर्ज दाखल केले. तसेच भाजपच्या नगरसेविका प्रतिभा वसंत मनकर यांनीही स्वतंत्र उमेदवारी अर्ज भरला. काँग्रेसचे नगरसेवक प्रदीप बाळासाहेब नाईकवाडी यांनीही नगराध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला.

नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे यांच्यावरील अविश्वास ठराव मंजूर झाल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार नवीन नगराध्यक्ष निवडीची प्रक्रिया सुरू झाली असून, सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिवस होता.

वैष्णवी धुमाळ यांच्या उमेदवारीवेळी नगरसेविका शीतल अमोल वैद्य, माजी नगराध्यक्ष





■ छाया । विद्याचंद्र सातपुते

बाळासाहेब वडजे, उपनगराध्यक्ष शरद नवले, काँग्रेसचे नगरसेवक प्रदीप नाईकवाडी यांच्यासह भाजपचे जिल्हा सरचिटणीस सीताराम भांगरे, सुनील दातीर, सुधाकर देशमुख, रावसाहेब वाकचौरे, मंडळ अध्यक्ष राहुल देशमुख, वाल्मिक नवले, बाळासाहेब सावंत तसेच अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

भाजपच्या दुसऱ्या गटाकडून गटनेत्या तमन्ना मोहसीन शेख यांच्या नेतृत्वाखाली सोनाली नाईकवाडी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी माजी नगरसेवक परशराम शेळके, चेतन नाईकवाडी, वसंतराव मनकर, मोहसीन शेख, नवनाथ मोहिते, प्रतिभा मनकर, जनाबाई मोहिते, विमल मंडलिक, श्वेताली रुपवते, माधुरी शेणकर, कविता शेळके, नगरसेवक नवनाथ शेटे, सागर चौधरी, हितेश कुंभार, आरिफ शेख आदी उपस्थित होते.

दरम्यान, उमेदवारी अर्ज माघारी घेण्याची मुदत मंगळवारी दुपारी ४ वाजेपर्यंत असून त्यानंतर अंतिम



निवडणूक चित्र स्पष्ट होणार आहे. मात्र नगराध्यक्षपदाची निवडणूक होणार हे निश्चित मानले जात असून, भाजपच्या दोन गटांतील मुख्य लढतीकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## विद्यार्थीकेंद्रित शिक्षण ही आधुनिक शिक्षण व्यवस्थेची गरज

### डॉ. संजय नगरकर । बाबुजी आव्हाड महाविद्यालयातील प्राध्यापक प्रबोधिनीचे उद्घाटन

**पाथर्डी । वीरभूमी –**

आज शिक्षणव्यवस्थेत झपाट्याने बदल होत असून प्रत्येक शिक्षकाने आपल्या अध्यापन पद्धतीतही बदल करणे आवश्यक आहे. पारंपरिक पाठांतर पद्धतीऐवजी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना, विचारक्षमतेला आणि कौशल्यविकासाला केंद्रस्थानी ठेवणारी विद्यार्थीकेंद्रित शिक्षणपद्धती हीच आधुनिक शिक्षण व्यवस्थेचा मुख्य कणा असल्याचे प्रतिपादन दादा पाटील महाविद्यालय, कर्जतचे प्राचार्य डॉ. संजय नगरकर यांनी केले.

येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात आयोजित



■ छाया । अनिल खाटेर

प्राध्यापक प्रबोधिनीच्या उद्घाटनप्रसंगी ते प्राध्यापकांना मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे होते.

डॉ. नगरकर म्हणाले, कोरोनाकाळात शिक्षण क्षेत्राचे मोठे नुकसान झाले. शिक्षणापासून दूर गेलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा मुख्य प्रवाहात आणणे हे शिक्षकांचे प्रमुख ध्येय आहे. शिक्षणसेवेला व्यवसाय नव्हे तर सामाजिक व्रत मानून कार्य करावे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात काही त्रुटी असल्या तरी त्यातील सकारात्मक बाबी स्वीकारून पुढे जाण्याची गरज आहे. प्राध्यापक प्रबोधिनीचा मुख्य उद्देश ज्ञानाचे आदानप्रदान हा असून बाबुजी आव्हाड महाविद्यालय वर्षभर या उपक्रमांतर्गत व्याख्यानमालेचे आयोजन करते, ही कौतुकास्पद बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्टाफ अकॅडेमीच्या समन्वयक डॉ. वैशाली आहेर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. अर्जुन केरकळ यांनी, तर आभार डॉ. भगवान सांगळे यांनी मानले.

## सद्गुरू शंकर महाराज भक्तीमठात गुरुपौर्णिमा उत्सवाचे आयोजन

**पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी शहरातील सद्गुरू शंकर महाराज भक्तीमठात बुधवारी होणाऱ्या गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सद्गुरू शंकर महाराज व परमपूज्य माधवबाबा यांना अभिवादन करत भक्तिभावाने हा उत्सव साजरा करण्यात येणार असून, सर्व गुरुबंधू व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून गुरूकृपेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

उत्सवानिमित्त पहाटे ४ ते ७ या वेळेत सद्गुरू शंकर महाराजांची महापूजा व रुद्राभिषेक करण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी ५ ते ७ या वेळेत नित्यपाठ वाचन होईल. सकाळी ८ ते ११ या वेळेत गुरुपूजन व गुरुवंदन सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे. तसेच दुपारी १२ वाजता महाआरती होणार आहे.

यानंतर दुपारी सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सद्गुरू शंकर महाराज भक्तीमठ, कासार गल्ली, पाथर्डी येथील श्री गुरुचरण सेवक व समस्त भक्तमंडळी यांनी सर्व भक्त, गुरुबंधू तसेच नागरिकांना या धार्मिक सोहळ्यास उपस्थित राहून लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

## दिंडी, रिंगण सोहळा व हरिनामाच्या गजराने गौतम पब्लिक स्कूलचा परिसर दुमदुमला

### आषाढी एकादशीनिमित्त दिंडी-रिंगण सोहळ्यातून धार्मिक परंपरा आणि संस्कारांचे विद्यार्थ्यांना अनोखे धडे

**कोपरगाव । वीरभूमी–**

आषाढी एकादशीचे औचित्य साधत सालाबादप्रमाणे याहीवर्षी गौतम पब्लिक स्कूलमध्ये वारकरी परंपरेचा संस्कारमय वारसा जपत शालेय दिंडी, रिंगण सोहळा आणि हरिनाम गजरातून निर्माण झालेले भक्तीमय वातावरण पुन्हा एकदा अनुभवायला मिळाले. विठ्ठल-रुक्मिणीच्या नामस्मरणाने, टाळ-मृदंगाच्या गजराने आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने संपूर्ण शाळा परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. धार्मिक परंपरा आणि आधुनिक शिक्षणाचा सुंदर संगम या उपक्रमातून पाहायला मिळाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ.रेखा जाधव यांनी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे महत्त्व, वारकरी संप्रदायाची समृद्ध परंपरा याविषयी मार्गदर्शन केले. कला-संगीत शिक्षक गोरक्षनाथ चव्हाण आणि संगीत विभागातील विद्यार्थ्यांनी विठ्ठल नामाचा अखंड गजर, अभंग, भजने व गवळणी सादर करत उपस्थितांना भक्तीमय वातावरणाची अनुभूती दिली. यावेळी प्राचार्य नूर शेख यांनी सर्व विद्यार्थी, शिक्षक व पालकांना आषाढी एकादशीच्या शुभेच्छा देत विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या प्रतिमेचे विधिवत पूजन तसेच अश्वपूजन केले. त्यानंतर टाळ-मृदंगाच्या निनादात आणि 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषात विद्यार्थ्यांची दिंडी वाजत-गाजत हनुमान ग्राउंडकडे रवाना झाली.

हनुमान ग्राउंडवर पार पडलेल्या रिंगण सोहळ्यात विद्यार्थ्यांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने सहभाग घेतला. हरिनामाच्या अखंड गजरात विद्यार्थी अक्षरशः देहभान विसरून विठ्ठलभक्तीत तल्लीन झाले होते. या भक्तिमय वातावरणामुळे उपस्थित पालक, शिक्षक आणि नागरिकांनाही पंढरीच्या वारीचा अनुभव मिळाला. दरवर्षीप्रमाणे यंदाही विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेता दिंडी व रिंगण सोहळ्याचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले होते.संस्थेचे चेअरमन मा.आ.अशोकरावजी काळे, विश्वस्त आमदार आशुतोष काळे, सचिव सौ.चैतालीताई काळे, इन्स्पेक्टर नारायण बारे, संस्थेचे सर्व सदस्य तसेच पालकांनी कार्यक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या संस्कारक्षम उपक्रमाचे अभिनंदन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी फिजिकल डायरेक्टर रमेश पठारे तसेच ज्योती शेलार, राजेंद्र आढाव, इसाक सय्यद, नसीर पठाण, जगदीश गिरी आणि प्रकाश भुजबळ यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी रमेश पठारे यांनी उपस्थितांचे आभार मानले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, शिक्षकांचे नियोजन आणि पालकांचा प्रतिसाद यामुळे हा सोहळा संस्मरणीय ठरला.



■ छाया । जनार्दन जगताप

### शिक्षण आणि संस्कार यांची सांगड घालणे हेच आमचे ध्येय

■ आषाढी एकादशी ही श्रद्धा, भक्ती आणि संस्कारांची परंपरा जपणारा पवित्र उत्सव आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत भारतीय संस्कृती, वारकरी परंपरा आणि नैतिक मूल्यांचे संस्कार मिळावेत, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. गौतम पब्लिक स्कूलमध्ये दरवर्षी साजरा होणारा आषाढी एकादशीचा दिंडी व रिंगण सोहळा हा धार्मिक श्रद्धा, भारतीय संस्कृती आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण यांचा सुंदर संगम असून अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये भक्ती, शिस्त, सेवाभाव आणि सामूहिकतेची भावना दृढ होते. शिक्षण आणि संस्कार यांची सांगड घालणे हेच आमचे ध्येय असून भविष्यातही असे संस्कारमय उपक्रम सातत्याने राबविण्यास संस्था कटिबद्ध आहे.

**– सौ. चैतालीताई काळे**

## जागतिक निसर्ग संवर्धन दिन :

# निसर्ग वाचविणे हीच मानवजातीची खरी जीवनसंजीवनी

दरवर्षी २८ जुलै हा दिवस जागतिक निसर्ग संवर्धन दिन म्हणून साजरा केला जातो. **या दिनाचा उद्देश केवळ झाडे लावणे किंवा पर्यावरणाबद्दल चर्चा करणे एवढाच नसून, संपूर्ण मानवजातीला निसर्गाच्या संरक्षणाची जबाबदारी समजावून देणे हा आहे. निसर्ग हा मानवाचा सर्वात मोठा जीवनदाता आहे. शुद्ध हवा, स्वच्छ पाणी, सुपीक जमीन, अन्नधान्य, औषधी वनस्पती, जंगल, नद्या आणि जैवविविधता यांवरच मानवी जीवनाचा पाया उभा आहे. म्हणूनच निसर्गाचे रक्षण करणे म्हणजे आपल्या अस्तित्वाचे रक्षण करणे होय.**

आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात विकासाला वेग आला आहे; मात्र या विकासाच्या शर्यतीत पर्यावरणाचा समतोल मोठ्या प्रमाणात बिघडत आहे. अंधाधुंद वृक्षतोड, वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, प्लास्टिकचा अनिर्बंध वापर, रासायनिक प्रदूषण, जीवाश्म इंधनाचा वाढता वापर आणि नैसर्गिक संसाधनांचा अविवेकी उपसा यामुळे पृथ्वीवरील पर्यावरणीय संतुलन धोक्यात आले आहे.

### निसर्गाचा समतोल बिघडल्याचे गंभीर परिणाम

गेल्या काही वर्षांत हवामान बदलाचे परिणाम अधिक तीव्रतेने जाणवत आहेत. पृथ्वीचे सरासरी तापमान सातत्याने वाढत आहे. उन्हाळ्यात उष्णतेच्या लाटा अधिक तीव्र होत असून अनेक भागांत विक्रमी तापमानाची नोंद होत आहे. दुसरीकडे, पावसाचे स्वरूप अनिश्चित झाले आहे. काही ठिकाणी अतिवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण होते, तर काही भागात दीर्घकाळ दुष्काळ पडतो. याचा सर्वाधिक फटका शेतकरी, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि अन्न उत्पादनाला बसतो.

हिमनद्या वितळणे, समुद्राची पातळी वाढणे, जंगलातील वणवे, जैवविविधतेचा ऱ्हास, वन्यजीवांचे अधिवास नष्ट होणे आणि अनेक प्रजाती नामशेष होण्याच्या उंबरठ्यावर पोहोचणे ही हवामान बदलाची गंभीर चिन्हे आहेत. याशिवाय वायू, पाणी आणि मृदा प्रदूषणामुळे दमा, हृदयविकार, श्वसनाचे आजार, त्वचारोग आणि इतर अनेक आरोग्यविषयक समस्या वाढत आहेत.

### मानव जीवनावर होणारे परिणाम

पर्यावरणाचा ऱ्हास हा केवळ निसर्गापुरता मर्यादित राहत नाही. त्याचा थेट परिणाम प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन जीवनावर होतो. पिण्याच्या पाण्याची टंचाई, शेती उत्पादनात घट, अन्नधान्याच्या किमतीत वाढ, नैसर्गिक आपत्तींची वाढती वारंवारता, स्थलांतर, बेरोजगारी आणि आर्थिक अस्थिरता यांसारख्या समस्या निर्माण होतात. पर्यावरणातील असमतोलामुळे भविष्यातील पिढ्यांचे जीवन अधिक कठीण होण्याची भीती आहे.



**वीरभूमी**
**बाबासाहेब रंगनाथ खेडकर**
पदवीधर शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सोनोशी, ता. पाथर्डी

### निसर्ग संवर्धन का आवश्यक आहे?

निसर्ग संवर्धन म्हणजे भविष्यातील पिढ्यांसाठी नैसर्गिक संपत्ती जपणे होय. आज आपण ज्या पृथ्वीचा उपभोग घेत आहोत, ती पुढील पिढ्यांनाही तितक्याच समृद्ध स्वरूपात मिळावी, ही आपली नैतिक जबाबदारी आहे. विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे हेच शाश्वत विकासाचे मूलभूत तत्त्व आहे.

शिक्षक हा समाजाचा संस्कारकर्ता असतो. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी प्रेम, जबाबदारी आणि संवेदनशीलता निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शिक्षक करू शकतो. पर्यावरण शिक्षण हे केवळ पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित न ठेवता ते प्रत्यक्ष कृतीशी जोडणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना निसर्गाशी जोडणारे अनुभव दिल्यास त्यांच्यात आयुष्यभर टिकणारी पर्यावरणपूरक जीवनशैली विकसित होते.

पृथ्वी ही आपल्या पूर्वजांकडून मिळालेली संपत्ती नसून ती आपल्या पुढील पिढ्यांकडून घेतलेली अमूल्य ठेव आहे. म्हणूनच तिचे जतन करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. जागतिक निसर्ग संवर्धन दिन हा केवळ एक दिवस साजरा करण्याचा कार्यक्रम नसून, पर्यावरण संरक्षणाचा आयुष्यभराचा संकल्प करण्याची संधी आहे.

आज आपण प्रत्येकाने एक झाड लावण्याचा, प्रत्येक थेंब पाणी वाचवण्याचा, प्रदूषण कमी करण्याचा आणि निसर्गाशी मैत्री करण्याचा निर्धार केला, तर उद्याची पृथ्वी अधिक हिरवीगार, स्वच्छ, समृद्ध आणि सुरक्षित असेल.

**निसर्गाचे रक्षण म्हणजेच मानवजातीच्या भविष्याचे रक्षण.**

**चला, निसर्ग जपूया... पर्यावरण वाचवूया... आणि भावी पिढीसाठी हरित, निरोगी व समृद्ध भारत घडवूया.**



### संवर्धनासाठी आवश्यक उपाययोजना

- मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करून झाडांचे संगोपन करणे.
- पाणी अडवा-पाणी जिरवा, पावसाचे पाणी साठवणे आणि जलसंधारणाची कामे करणे.
- प्लास्टिकचा वापर टाळून पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारणे.
- कचऱ्याचे वर्गीकरण, पुनर्वापर आणि पुनर्चक्रण करणे.
- ऊर्जा बचत करून सौरऊर्जेसारख्या स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढवणे.
- जैवविविधतेचे संरक्षण करणे आणि वन्यजीवांचे अधिवास जपणे.
- पर्यावरणपूरक शेती आणि सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देणे.
- प्रत्येक नागरिकाने पर्यावरण संरक्षणाची वैयक्तिक जबाबदारी स्वीकारणे.

### विद्यार्थ्यांसाठी उपक्रम

- एक विद्यार्थी – एक झाड अभियान.
- वृक्षारोपण आणि वर्षभर झाडांचे संगोपन.
- प्लास्टिकमुक्त शाळा अभियान.
- पाणी बचतीची प्रतिज्ञा आणि जलसंधारण जनजागृती.
- स्वच्छता अभियान आणि कचरा व्यवस्थापन.
- औषधी वनस्पतींची बाग व जैवविविधता उद्यान.
- पक्ष्यांसाठी पाणपोई आणि दाणापात्र उपक्रम.
- पर्यावरण विषयक निबंध, चित्रकला, वक्तृत्व आणि घोषवाक्य स्पर्धा.
- निसर्गभ्रमण, पक्षीनिरीक्षण आणि स्थानिक जैवविविधतेचा अभ्यास.
- पर्यावरण जनजागृती रॅली आणि ग्रामस्वच्छता अभियान.

हे उपक्रम शाळांमधून प्रभावीपणे राबविता येतील.

# सावळीविहीर खुर्दच्या विकासकामांची डॉ. सुजय विखे पाटील यांच्याकडून पाहणी

## पशुवैद्यकीय महाविद्यालय, आयटीआय, एमआयडीसीतील मूलभूत सुविधांचा आढावा । गुणवत्तेशी तडजोड न करण्याच्या सूचना

**● शिर्डी । वीरभूमी –**
सावळी विहीर खुर्द येथे सुरू असलेल्या शैक्षणिक, औद्योगिक आणि पायाभूत विकासकामांना गती देण्यासाठी भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी सोमवारी विविध प्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली. राज्यासाठी महत्त्वाच्या पशुवैद्यकीय महाविद्यालयासह एमआयडीसी परिसरातील रस्ते, गटार, पाणीपुरवठा, पंपिंग स्टेशन, आयटीआय महाविद्यालयाच्या इमारतीची प्रगती आणि अन्य मूलभूत सुविधांचा त्यांनी आढावा घेतला. यावेळी अधिकारी, अभियंते, ठेकेदार आणि ग्रामस्थांसमवेत विकासकामांबाबत चर्चा करत गुणवत्तेशी कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सर्वप्रथम डॉ. विखे पाटील यांनी उभारण्यात येत असलेल्या राज्यातील महत्त्वाकांक्षी पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या कामाची पाहणी केली. पशुवैद्यकीय शिक्षण व संशोधनासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या या प्रकल्पामुळे विद्यार्थ्यांना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध होणार असून पशुसंवर्धन क्षेत्रालाही नवी दिशा मिळणार आहे. महाविद्यालयाची मुख्य इमारत, शैक्षणिक विभाग, प्रयोगशाळा, प्रशासकीय इमारत, विद्यार्थी सुविधा आणि पूरक बांधकामांची प्रगती त्यांनी तपासली.

बांधकामाच्या प्रत्येक टप्प्यावर दर्जेदार साहित्याचा वापर व्हावा, तांत्रिक निकषांचे काटेकोर पालन करून सर्व कामे नियोजित वेळेत पूर्ण करावीत, अशा सूचना त्यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या. काही ठिकाणी आवश्यक सुधारणा सुचवत त्या तातडीने पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

यानंतर त्यांनी एमआयडीसी परिसरात सुरू असलेल्या आयटीआय महाविद्यालयाच्या इमारतीची पाहणी केली. या महाविद्यालयामुळे परिसरातील युवकांना आधुनिक तांत्रिक शिक्षण व कौशल्य प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होऊन स्थानिक रोजगारनिर्मितीला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. इमारतीच्या कामाच्या गुणवत्तेबाबतही त्यांनी संबंधित अधिकारी व ठेकेदारांना आवश्यक सूचना दिल्या.

त्यानंतर एमआयडीसी परिसरातील पंपिंग स्टेशनची पाहणी करून औद्योगिक विकासासाठी सातत्यपूर्ण व पुरेशा पाणीपुरवठ्याचे महत्त्व अधोरेखित केले. पंपिंग स्टेशनची कार्यक्षमता, यंत्रसामग्रीची स्थिती, भविष्यातील पाण्याची गरज आणि देखभाल व्यवस्थेचा आढावा घेत उद्योगांना पाणीटंचाई भासू नये, यासाठी आवश्यक उपाययोजना वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

यावेळी त्यांनी एमआयडीसी परिसरातील अंतर्गत रस्ते, गटार व्यवस्था, सांडपाणी निचरा, स्वच्छता, अतिक्रमण, वीज व पाणीपुरवठा आदी मूलभूत सुविधांचीही पाहणी केली. काही ठिकाणी रस्त्यांची दुरवस्था, पावसाळ्यात पाणी साचण्याच्या समस्या आणि गटार व्यवस्थेतील त्रुटी निदर्शनास आल्या. ग्रामस्थांनी विविध अडचणी मांडत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

पाहणी दौऱ्यावेळी संबंधित विभागांचे अधिकारी, अभियंते, ठेकेदार, ग्रामस्थ आणि स्थानिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# संजीवनी इंजिनिअरींगच्या ९१७ विद्यार्थ्यांना देश-परदेशात नोकऱ्या

## रुपये ३२ लाखांचे उच्चांकी वार्षिक पॅकेज । सरासरी पॅकेज रू ६.८ लाखांचे



**● कोपरगाव । वीरभूमी –**
संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे विद्यार्थ्याला जपानमधील एसएमसी कंपनीत तब्बल रुपये ३२ लाखांचे वार्षिक पॅकेज मिळाले. हा केवळ एका विद्यार्थ्याचा नव्हे, तर त्याच्या पालकांच्या स्वप्नपूर्तीचा आणि संजीवनीच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अभिमानास्पद क्षण आहे. अशाच प्रकारे क्रेडने रू ३० लाख, टॉपी इंडस्ट्रिज, जपानने रू २५ लाख, डायकिन एअर टेक्नॉलॉजी, जपानने रू २२ लाख, आयसीन, जपानने रू २० लाख, ओपन अप कन्स्ट्रक्शन, जपानने रू १७ लाख, अवलारा कंपनीने रू १४.५ लाख, जस्पे कंपनीने रू ११ लाख असे वार्षिक पॅकेज देवुन नोकरीची संधी दिली. अशा प्रकारे एकुण २०० पेक्षा अधिक नामांकित कंपन्यानी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधिल एकुण ९१७ विध्यार्थ्यांना नोकरीची संधी दिली.

आई-वडिलांची सर्वात मोठी संपत्ती म्हणजे त्यांची मुले. पालक आपल्या पाल्यांचे उज्वल भविष्य घडावे या विश्वासाने त्यांना संजीवनीमध्ये शिक्षणासाठी दाखल करतात आणि संजीवनी त्या विश्वासाला यशस्वी करिअरची भक्कम साथ देते.

एकुण २०० कंपन्यांपैकी टीसीएस, जॉन्सन कंट्रोल्स इंटरनॅशनल पीएलसी, विसेन इन्फोटेक, फिलिप्स ग्लोबल बिझिनेस सर्विसेस, वेस्को डीजिटल इनोव्हेशन सेंटर, बॉश लिमिटेड, गोदरेज इन्फोटेक, महिंद्रा अँड महिंद्रा, फॉरेसिया, फॉर्विस माझार्स, या कंपन्यांचा विद्यार्थी निवडीमध्ये मुख्य समावेश आहे. या विक्रमी निवडीत कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या ११९, इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजीच्या १०५, मेकॅनिकल इंजिनिअरींगच्या १५४, इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या ८५, इलेक्ट्रिकल इंजिनिअरींगच्या ९१, सिव्हिल इंजिनिअरींगच्या ७९, मेकॅट्रॉनिक्स इंजिनिअरींगच्या ९०, स्ट्रक्चरल इंजिनिअरींगच्या ५८ व एमबीए विभागाच्या १३६ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

२०१९ पासून संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजला स्वायत्त (ऑटोनॉमस) दर्जा प्राप्त झाल्यानंतर कॉलेजने शिक्षणाची गुणवत्ता, उद्योगाभिमुख अभ्यासक्रम आणि कौशल्याधारित प्रशिक्षण यांचा उत्कृष्ट संगम साधला आहे. त्यामुळे दरवर्षी विध्यार्थ्यांना मिळणाऱ्या नोकऱ्यांची संख्या आणि वार्षिक वेतन पॅकेज सातत्याने वाढत आहे. प्रत्येक यशस्वी प्लेसमेंट ही केवळ एका विद्यार्थ्याची उपलब्धी नसून, त्याच्या आई-वडिलांच्या अथक कष्टांचे, विश्वासाचे आणि आयुष्यभर जपलेल्या स्वप्नांचे साकार रूप आहे. संजीवनी प्रत्येक विद्यार्थ्यांच्या यशामागे उभी राहून केवळ पदवीधर घडवत नाही, तर कुटुंबांचे भविष्य उज्ज्वल करणारे सक्षम, आत्मविश्वासी आणि जागतिक स्तरावर यशस्वी नोकरदार आणि व्यावसायिकही घडवत आहे.

संजीवनीचे अध्यक्ष श्री नितिनदादा कोल्हे व मॅनेजिंग ट्रस्टी श्री. अमित कोल्हे यांनी निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे त्यांचे पालक, डायरेक्टर आर. ए. कापगते आणि ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या सर्व टीमचे अभिनंदन केले आहे.

# आबासाहेब काकडे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

## २४२ गुण मिळवत ओमसाई सानप विद्यालयात प्रथम

**● शेवगाव । वीरभूमी –**
आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या आबासाहेब काकडे विद्यालय, शेवगाव येथील विद्यार्थ्यांनी इयत्ता सातवी शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक परंपरेत आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. विद्यार्थ्यांच्या यशामुळे विद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण असून, त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

परीक्षेत ओमसाई विशाल सानप याने २४२ गुण मिळवत विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. वेदांत भाऊसाहेब शिंदे (२३४), आराध्या नीलकंठ आमले (२२६), आरुषी सुरेश भापकर (२१६) आणि तेजस्विनी संभाजी पांजरे (२१०) यांनीही उत्कृष्ट यश मिळविले.

तसेच ऋत्वी राजेश दारकुंडे (१८२), ऋतुराज अंकुश गवळी (१७८), राज राहुल वरे (१७४), शंभूराजे सुभाष देठे (१७०), प्रतीक्षा शिवाजी कातोरे (१५६), वैभव अनिल वेताळ (१५६), कार्तिकी योगेश दसपुते (१४६), प्रसाद संभाजी वाघुंबरे (१४०), आदर्श रामेश्वर पालवे (१४०), आरती शंकर काटे (१३८) आणि ज्ञानेश्वरी राजू झिरपे (१३२) यांनीही गुणवत्तापूर्ण यश संपादन केले.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची मेहनत, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. शिष्यवृत्ती परीक्षेसाठी विद्यालयात विशेष मार्गदर्शन वर्ग, सराव परीक्षा आणि वैयक्तिक मार्गदर्शनाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली होती. त्याचाच परिपाक म्हणून विद्यार्थ्यांनी ही उल्लेखनीय कामगिरी केली.

या यशाबद्दल कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष ॲड. विद्याधर काकडे, विश्वस्त हर्षदा काकडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पृथ्वीसिंग काकडे, शैक्षणिक विभाग प्रमुख वंदना पुजारी, शिक्षण विभाग सहप्रमुख अशोक आहेर, प्राचार्य डॉ. लक्ष्मण बिटाळ, उपप्राचार्य अनिल मगर, पर्यवेक्षक लक्ष्मण गाडे, पंढरीनाथ पल्हारे आणि मोहिनी बडधे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. भविष्यातही अशीच गुणवत्तापूर्ण यशाची परंपरा कायम राहील, असा विश्वास व्यक्त करत विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# देवठाण ग्रामस्थांकडून आढळा धरणाचे जलपुजन

**● अकोले । वीरभूमी–**
अकोले तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नद्या, नाले आणि धरणांच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर देवठाण येथील आढळा धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



■ छाया । विद्याचंद्र सातपुते

धरण भरल्याचा आनंद साजरा करण्यासाठी देवठाण ग्रामस्थांसह कार्यक्षेत्रातील शेकडो नागरिकांनी उत्साहात आढळा धरणाचे जलपूजन केले. टाळ-मृदुंगाच्या गजरात जलदिंडी काढत भाविक धरणावर पोहोचले. त्यानंतर विधिवत पूजा करून धरणाला साडी-चोळी व नारळ अर्पण करत जलपूजन करण्यात आले.

या सोहळ्यास अमृतसागर दूध संघाचे व्हाइस चेअरमन रावसाहेब वाकचौरे, माजी पंचायत समिती सदस्य अरुण शेळके, सरपंच विजया सहाने, राजाराम पथवे, अब्दुल इनामदार, राजेंद्र कराड यांच्यासह अनेक मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते. देवठाण आणि परिसरातील शेकडो नागरिक, विशेषतः महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

आढळा धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने आगामी हंगामासाठी सिंचनाच्या पाण्याची उपलब्धता वाढणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. कार्यक्रमानंतर उपस्थित ग्रामस्थांना महाप्रसादाचे भोजन देण्यात आले.

# नगरसेविका दिपाली बंग यांच्या पाठपुराव्याने रखडलेल्या रस्त्याच्या कामाला सुरुवात

## मुख्याधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने काम पूर्ण करण्याचे ठेकेदाराला दिले होते निर्देश

**● पाथर्डी । वीरभूमी –**
पाथर्डी शहरात महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत सुरू असलेल्या मलनिस्सारण (यूजीडी) प्रकल्पाच्या रखडलेल्या कामामुळे नागरिकांना होत असलेल्या गैरसोयीची नगरसेविका दिपाली बंग यांनी तक्रार केल्यानंतर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे यांनी संबंधित भागाची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यानंतर संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांना काम तातडीने आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.



■ छाया । अनिल खाटेर

आगामी गणेशोत्सव, गौरीपूजन, श्रावण मास आणि इतर धार्मिक सणांपूर्वी रखडलेल्या कामाला गती मिळाल्याने नागरिकांनी माजी नगरसेवक रामनाथ बंग, नगरसेविका दिपाली बंग तसेच मुख्याधिकारी संतोष लांडगे यांचे आभार मानले.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत रूपाली टेलर ते खालचा गणपती, मौलाना आझाद चौक आणि मंत्री बोळ परिसरात यूजीडीचे काम अनेक दिवसांपासून संथगतीने सुरू असल्याने नागरिक व व्यापाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. रस्ते खोदून ठेवल्यामुळे वाहतुकीत अडथळे निर्माण झाले होते. धूळ, चिखल आणि अपूर्ण कामामुळे परिसरातील दैनंदिन जनजीवनही विस्कळीत झाले होते.

या समस्येची गंभीर दखल घेत माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेविका दिपाली रामनाथ बंग यांनी नगरपरिषद प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली होती. त्यानंतर मुख्याधिकारी संतोष लांडगे यांनी घटनास्थळी भेट देऊन कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला.

पाहणी दरम्यान मुख्याधिकाऱ्यांनी संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांना कोणताही विलंब न करता निर्धारित कालावधीत गुणवत्तापूर्ण काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले. तसेच नागरिकांना होणारा त्रास कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने राबविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी मुख्याधिकारी संतोष लांडगे, माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेविका दिपाली रामनाथ बंग, माजी नगरसेवक रामनाथ बंग, नगरपरिषदेचे अधिकारी विशाल मढवई, शिवा पवार, बाळासाहेब लाहोटी, अविनाश मंत्री तसेच परिसरातील नागरिक, व्यापारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्याधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष पाहणीनंतर आणि दिपाली बंग यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अनेक दिवसांपासून रखडलेल्या यूजीडी प्रकल्पाच्या कामाला गती मिळाली असून, प्रशासनाने अशाच पद्धतीने शहरातील अन्य प्रलंबित विकासकामांनाही प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली.

# देशी गोवंश संवर्धनासाठी शास्त्रशुद्ध संगोपनाची गरज

## डॉ. लामखडे । तळणी येथील श्रीकृष्ण गोशाळेत जनजागृती कार्यक्रम; नैसर्गिक शेती, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि पशुपालन विकासावर भर

**● शेवगाव । वीरभूमी –**
देशी गोवंशाचे संवर्धन ही केवळ सांस्कृतिक किंवा धार्मिक परंपरा नसून शाश्वत शेती, पर्यावरण संवर्धन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी अत्यंत महत्त्वाची बाब आहे. देशी गायींचे दूध, शेण आणि गोमूत्र यांचा शेती, आरोग्य तसेच पर्यावरणाच्या दृष्टीने मोठा उपयोग होत असल्याने प्रत्येक पशुपालकाने देशी गोवंशाच्या संगोपनाला प्राधान्य द्यावे, असे प्रतिपादन पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. बी. जी. लामखडे यांनी केले.

शुद्ध देशी गोवंश जतन व संवर्धन दिनानिमित्त तळणी (ता. शेवगाव) येथील श्रीकृष्ण गोशाळेत जनजागृती, मार्गदर्शन व गोसंवर्धन विषयक विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीकृष्ण गोशाळेचे अध्यक्ष श्रीहरी महाराज घाडगे होते. पंचायत समितीचे पशुधन विकास अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर जाधव यांच्यासह शेतकरी, गोभक्त, पशुपालक, महिला, युवक आणि परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविकात श्रीहरी महाराज घाडगे यांनी श्रीकृष्ण गोशाळेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. गोमातांचे संगोपन, आरोग्य संवर्धन, हिरव्या चाऱ्याची उपलब्धता, पंचगव्य उत्पादनांची निर्मिती, सेंद्रिय शेतीचा प्रसार तसेच स्वावलंबी गोशाळा उभारणीसाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचा त्यांनी आढावा घेतला.

डॉ. लामखडे म्हणाले, पशुपालकांनी आधुनिक पशुसंवर्धन तंत्रज्ञानाचा अवलंब करून देशी गोवंशाचे शास्त्रशुद्ध संगोपन करावे. शासनाच्या पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, लसीकरण मोहीम, पशुवैद्यकीय सेवा आणि दुग्ध व्यवसाय विकास योजनांचा लाभ घेऊन ग्रामीण भागातील पशुपालन अधिक सक्षम करावे.

यावेळी डॉ. ज्ञानेश्वर जाधव यांनी देशी गाईंच्या वैज्ञानिक संगोपनाबाबत मार्गदर्शन केले. संतुलित आहार, नियमित लसीकरण, आरोग्य तपासणी, स्वच्छ गोठा व्यवस्थापन आणि आधुनिक गोपालन तंत्रज्ञानाचा वापर केल्यास पशुधनाचे आरोग्य सुधारून उत्पादनक्षमतेत वाढ होते. देशी गोवंश संवर्धनामुळे नैसर्गिक व सेंद्रिय शेतीला चालना मिळण्याबरोबरच ग्रामीण रोजगारनिर्मितीलाही मोठा हातभार लागतो, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात गोआधारित शेती, पंचगव्य उत्पादनांचे महत्त्व, सेंद्रिय खतांचा वापर, पर्यावरण संरक्षणातील देशी गोवंशाची भूमिका आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेत गोपालनाचे योगदान याविषयी सविस्तर जनजागृती करण्यात आली. उपस्थित शेतकरी व पशुपालकांनी तज्ज्ञांशी संवाद साधत पशुपालनातील विविध समस्यांवर चर्चा केली. शासनाच्या योजनांचा लाभ, पशुधनाचे आरोग्य व्यवस्थापन, दुग्ध व्यवसायातील संधी आणि देशी गोवंश संवर्धनासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन मिळाल्याने उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.



■ छाया । अमोल कराळे

कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन श्रीकृष्ण गोशाळेच्या कार्यकर्त्यांनी केले. उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. शेवटी श्रीहरी महाराज घाडगे यांनी सर्व मान्यवर, शेतकरी, गोभक्त, ग्रामस्थ आणि स्वयंसेवकांचे आभार मानले. 'गोमाता की जय' आणि 'गौसेवा हीच ईश्वर सेवा' या घोषणांनी कार्यक्रमाची उत्साहपूर्ण सांगता झाली.